# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ५ वे अंक ३३ रविवार दि.०३ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## साहित्यरत्न अण्णाभाऊ आणि लोकमान्य टिळक यांना भाजप नेते आ. कराड यांच्याकडून विनम्र अभिवादन




लातूर : – स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच अशी घोषणा देणारे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे अग्रगण्य नेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि आपल्या साहित्यातून समाजाला दिशा देणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी या दोन्ही थोर महापुरुषांना पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात महान स्वातंत्र्यसेनानी, उत्कृष्ट वक्ते, उत्तम समाजसुधारक, पत्रकार, लेखक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी आणि आपल्या लेखणीतून कष्टकरी, उपेक्षित वर्गाच्या वेदना जगासमोर मांडणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी पुष्पांजली अर्पण करून साजरी करण्यात आली यावेळी भाजपाचे किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम काका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले यांच्यासह मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, सतीश आंबेकर, बाबासाहेब घुले, पद्माकर चिंचोलकर, अनंत चव्हाण, दशरथ सरवदे, पांडुरंग बालवाड, रुपेश काळे, आदिनाथ मुळे, ललिता कांबळे, शीला आचार्य, भाऊसाहेब गुळबिले, मारुती शिंदे व इतर अनेकजण होते.

## लातूर तहसील कार्यालयात महसूल सप्ताहाला उत्साहात प्रारंभ






लातूर :- महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार ०१ ते ०७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत साजऱ्या होणाऱ्या महसूल सप्ताहाला लातूर तहसील कार्यालयात मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके आणि उपविभागीय अधिकारी रोहिणी न–हे–विरोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. सचिन जाधव यांनी विशेष पाहुणे म्हणून मार्गदर्शन केले. कार्यक्रमास तहसीलदार सौदागर तांदळे, उपविभागीय आणि तहसील कार्यालयातील सर्व नायब तहसीलदार, ग्रामविकास अधिकारी, मंडळ अधिकारी, सहायक महसूल अधिकारी, महसूल सहायक, महसूल सेवक आणि कर्मचारी उपस्थित होते. डॉ. सचिन जाधव यांनी तणावमुक्त जीवनासाठी मौलिक मार्गदर्शन केले. यावेळी महसूल विभागातील अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या गुणवंत आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पाल्यांचा सत्कार करण्यात आला. महसूल सप्ताहात विविध उपक्रमांचे आयोजन

## राष्ट्रीय मौखिक आरोग्य अभियानांतर्गत साळेगाव येथील शंकर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचे दंत तपासणी




केज/प्रतिनिधी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत व उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दत्तात्रय केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय मौखिक आरोग्य अभियानांतर्गत दिनांक २ ऑगस्ट २०२५ रोजी केज तालुक्यातील साळेगाव येथील शंकर माध्यमिक विद्यालयातील जवळपास ३५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची मौखिक दंत तपासणी उपजिल्हा रुग्णालयाचे दंतशल्य चिकित्सक डॉ. रमण दळवी यांनी केली. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना दोन वेळा ब्रश करण्याचे महत्त्व, चॉकलेट जंक फूड इत्यादींचे दुष्परिणाम कायअसतात या बद्दलची सविस्तर माहिती समजावून सांगून मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. दैनंदिन आरोग्य व समतोल आहार याचे महत्त्व समुपदेशक श्रीमती सीता गिरी यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. शाळेचे मुख्याध्यापक श्री तांबारे सर व सर्व शिक्षक वृंद यांनी शिबिराच्या आयोजनासाठी विशेष सहकार्य केले.

मोठ्या प्रमाणात होत असलेल्या अशा पद्धतीच्या दंत तपासणी शिबिरामुळे शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांमधून समाधान व्यक्त करत आहेत.

# बहुजन समाजाने सर्वांगीण विकासासाठी आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाकडे लक्ष देणे आवश्यक - प्रा. डॉ नागोरावजी कुंभार



लातूर :– लातूर जिल्हा कुंभार समाज विकास मंडळाच्यावतीने आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळा शनिवार दिनांक २ ऑगस्ट २०२५ रोजी आदिनाथ मंगल कार्यालय ,लातूर .येथे लातूर जिल्हा कुंभार समाज विकास मंडळ ,लातूरयांच्या वतीने आयोजित समाजभूषण उद्योगरत्न व समाजरत्न पुरस्कार, सेवानिवृत्त कर्मचारी गौरव, शासकीय सेवेत रुजू झालेले कर्मचारी व गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ २०२५ मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.

डॉ प्राचार्य नागोराव कुंभार सर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमाला कुंभार समाज सामाजिक संस्था राज्याचे अध्यक्ष रमाकांतजी क्षीरसागर संस्थापक अध्यक्ष सतीशदादा दरेकर,सचिव संजयजी भालेराव,स्वाभिमानी कुंभार समाज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विजयरावजी देवडे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी धाराशिव अनंतरावजी कुंभार, बाळासाहेब कुंभार (हवेली तालुका कुंभार समाज विकास मंडळ अध्यक्ष ) श्री हनुमंत कुंभार (सोलापूर जिल्हा कुंभार समाज संघटना मा अध्यक्ष ) श्री पुंडलिक सोनवणे माननीय श्री भरत शिरसाट (वधू वर सूचक मंडळ राज्याध्यक्ष ) माननीय श्री शिवाजी पांगरेकर (सचिव स्वाभिमानी कुंभार समाज नांदेड ) लातूर जिल्हा अध्यक्ष ड.वैजनाथ कुंभार सचिव राजकुमार राजारुपे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झालेल्या समारंभात २०२५ चा कुंभार समाजरत्न पुरस्कार माननीय श्री अनंत रामभाऊ कुंभार (उपमुख्य कार्यकारी अधिकारी धाराशिव) कुंभार उद्योगरत्न पुरस्कार माननीय श्री राजकुमार बाबुराव राजारुपे (संचालक, प्रधानमंत्री जनऔषधि केंद्र ,गांधी चौक, लातूर .) माननीय श्री गणेश दुष्यंत कुंभार (व्यवस्थापक आदिनाथ मंगल कार्यालय लातूर ) समाज भूषण पुरस्कार माननीय श्री दिलीप रामचंद्र कानगुले ( लेखक ,बालभारती अभ्यास मंडळ सदस्य, पुणे. ) श्रीमती इंदुमती नागनाथ कुंभार (ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, सेवानिवृत्त अध्यापिका ) प्रा डॉ विजय तुळशीराम गोरगिळे (शाहीर आण्णाभाऊ साठे वरिष्ठ महाविद्यालय मुखेड ) प्रा डॉ दगडू तुकाराम घटकार (संभाजीराव केंद्रे वरिष्ठ महाविद्यालय जळकोट ) प्रा डॉ दयानंद विश्वनाथ राजे ( राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर ) *माननीय श्री अमोल गंगाधर घुमाडे (कुंभार समाज प्रदेश सरचिटणीस युवक आघाडी ) यांना प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते सपत्निक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. प्रदीर्घ सेवेनंतर कालवयोमाना प्रमाणे सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. समाजाला भूषण व असणाऱ्या विविध आस्थापनेवर नवनियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. समाजातील उच्चविद्याविभूषित डॉक्टर ,इंजिनिअर, पदवी, पदव्युत्तर, दहावी ,बारावी व विविध शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या १४० विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. आयोजित कुंभार समाज मेळाव्यात महाराष्ट्र राज्य कुंभार समाज सामाजिक संस्थेच्या वतीने लातूर जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांना कुंभार समाज सामाजिक संस्था राज्याचे अध्यक्ष रमाकांतजी क्षीरसागर संस्थापक अध्यक्ष सतीशदादा दरेकर यांच्या शुभहस्ते नियुक्तीपत्र देऊन अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या ज्यात लातूर जिल्ह्याचे विद्यमान जिल्हाध्यक्ष ड वैजनाथराव कुंभार यांना नांदेड विभागीय कुंभार समाज विकास मंडळाचे अध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आले लातूर जिल्ह्याचे विद्यमान सचिव राजकुमार राजारुपे यांना नांदेड विभागीय उपाध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आले,गणेश कुंभार यांना राज्याचे युवा संघटक म्हणून जबाबदारी देण्यात आली तर माननीय अमोल घुमाडे यांना प्रदेश सरचिटणीस युवक आघाडी पदी नियुक्तीपत्र देण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्ष –डॉ. प्रा.नागोरावजी कुंभार बहुजन समाजाने सर्वांगीण विकासासाठी आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. बहुजन समाजाची अकलक्षमता आणि विचारच्या क्षमता वृद्धीसाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. विकास आणि परिवर्तनासाठी विचारपूर्वक आणि चिकाटीने सातत्याने कार्य करण्याची गरज आहे. सामाजिक परिवर्तनासाठी विशिष्ट दिशेने विचार केल्यास या प्रयत्नांना व चळवळींना यश येऊ शकते परिवर्तनाचा विचार करताना वंचित उपेक्षित माणसांना केंद्र मानून परिवर्तनाचा विचार केला गेला पाहिजे. त्यासाठी सामान्य माणूस आर्थिकदृष्ट्या सक्षम कसा होईल ? त्यांच्यात शैक्षणिक अभिसरण, सांस्कृतिक नेतृत्व निर्मिती यासाठी प्रयत्नांची पराकष्ठा करावी लागेल. पुढे ते म्हणाले की, शिक्षणाशिवाय बहुजन समाजाचा उद्धार व विकास होणार नाही, यासाठी गरिबांची मुले शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. डॉ. आंबेडकरांनी डॉ. राधाकृष्णन यांनी व संत गाडगेबाबा यांनी शिक्षणाचे महत्त्व आधुनिक केले आहे. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शिक्षण म्हणजे पुनर्जन्म आहे. शिक्षण म्हणजे देशाच्या सर्व सामाजिक रोगावरील जालीम औषध आहे. यापुढे सांगता येईल नशिकलेला माणूस हा नर्मदेतील धोंडा असतो असे प्रतिपादन केले. हे लक्षात घ्यावयास हवे. सर्वांनी संघटित होऊन अहंकार, द्वेष, मत्सर, आदी विकारांचे विसर्जन करून गट, तट न करता सर्वांना सोबत घेऊन, सशक्त सामाजिक संघटन उभा करणे काळाची गरज आहे. असे ते म्हणाले. उपस्थित विद्यार्थ्यांना माननीय श्री अनंत कुंभार उपमुख्य कार्यकारी अधिकारी धाराशिव यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन लाभले.राज्याचे अध्यक्ष रमाकांत क्षिरसागर व राज्यचेसंस्थापक अध्यक्ष सतीश दादा दरेकर यांची समाजाला उद्देशून प्रेरक भाषणे झाली

कार्यक्रमाचे प्रास्ताविक लातूर जिल्ह्याचे अध्यक्ष ड. वैजनाथराव कुंभार यांनी केले तर उपस्थितांचे आभार सचिव श्री राजकुमार राजारुपे यांनी मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप कानगुले यांनी केले कार्यक्रमास कुंभार समाजातील बंधू–भगिनी गुणवंत विद्यार्थी कर्मचारी यांची बहुसंख्य उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संयोजक–महादेव कानगुले, विलास कोत्तापुरे, होते तर अमोल घुमाडे, सुनील बेल्लाळे ,गणेश कुंभार, त्र्यंबक कुंभार, दगडू घटकार, राजकुमार गुडाप्पे, दिलीप मोहोळकर, डॉ .विजय गोरगिळे, ज्ञानोबा पोचापुरे, डॉ रमेश शेळके, दत्ता रामरुळे,दत्ता मोहोळकर, संग्राम तांबळगे,अशोक कोत्तापुरे, बाळासाहेब राजे, कमलाकर कुंभार,विजय राजारुपे,गुरुनाथ मोहोळकर, गंगाधर इसापुरे, महंतेश कदंगल, महादेव घुमाडे,आनंद राजारूपे आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी .परिश्रम घेतले.

## लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त माजी आमदार धिरज देशमुख यांचे कडून अभिवादन.




लातूर:–– मानवतावादी आणि शोषणमुक्त समाज निर्माण व्हावा, हे ध्येय बाळगून तळागाळातील शोषित समूहांचे जगणे शब्दबध्द करणारे थोर साहित्यसम्राट, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित अभिवादन कार्यक्रमास उपस्थित राहून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँक अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तसेच प्रभाग १ मध्ये आयोजित अभिवादन कार्यक्रमास उपस्थित राहून साहीत्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंखे, शहर अध्यक्ष किरण जाधव, संतोष देशमुख, डॉ दिनेश नवगिरे, कैलास कांबळे, जिवन सुरवसे, प्रविण पाटील,मोहन माने,गोपाळ बुरबुरे,आशिष चिकटे, चंद्रकांत चिकटे, मोहन सुरवसे, प्रविण सुर्यवंशी, समद पटेल आदींची उपस्थिती होती.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शाक्यसंघ माता भीमाई संघटनेची मानवंदना



लातूर : साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांची १०५ वी जयंती आज शहरात उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने शाक्यसंघ माता भीमाई सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी व अधिकारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना पुष्प अर्पण करून मानवंदना दिली. याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष शाहूराज कांबळे, उपाध्यक्ष दिलीप कांबळे, कोषाध्यक्ष रोहिदास सोनकांबळे, सचिव शिवाजी कांबळे. सल्लागार त्र्यंबक कवठेकर, शंकर शिंदे, सदस्य अंगद कांबळे, अशोक कांबळे, मोहन कांबळे, जालिंदर कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## मंगळवारी आ. रमेशआप्पा कराड यांचा रेणापूर येथे तिसरा जनता दरबार होणार



लातूर : – लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत येत्या ०५ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी रेणापूर येथील रेणुकाई मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला असून आ. कराड यांचा हा तिसरा जनता दरबार आहे.

गोरगरीब सर्वसामान्य आणि तळागाळातील माणसाचे प्रश्न, अडीअडचणी आणि व्यथा समजून घेण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी लातूर ग्रामीण मतदार संघात दर तीन महिन्याला लातूर तालुक्यात दोन, रेणापूर तालुक्यात एक आणि भादा सर्कल मध्ये एक याप्रमाणे चार ठिकाणी जनता दरबार घेण्यात येणार असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी घोषित केले होते. त्यानुसार लातूर तालुक्यातील मुरुड आणि ममदापूर येथे नुकताच जनता दरबार घेण्यात आला. या दोन्ही ठिकाणी सर्व स्तरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बऱ्याच जणांचे प्रश्न जागेवरच निकाली निघाले तर अनेक प्रश्नांना सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देऊन महिनाभरात निकाली काढण्याचे बोलून दाखवले.

येत्या ०५ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी रेणापूर तालुक्यातील रेणापुर शहरासह खरोळा, पानगाव, कामखेडा आणि पोहेगाव जिल्हा परिषद सर्कल मधील जनतेचा रेणापूर येथील रेणुकाई मंगल कार्यालयात सकाळी १० वाजता लातूर ग्रामीणचे आमदार श्री, रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत जनता दरबारचे आयोजन करण्यात आले आहे.

# संपादकीय

## परकीय गुंतवणूक भरारी; पण...

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय तसेच रिझर्व्ह बँकेनुसार, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारतात एकूण ८१.०४ अब्ज अमेरिकन डॉलरची प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक (एफडीआय) झाली असून मागील आर्थिक वर्षातील ७१.२८ अब्ज डॉलरच्या तुलनेत ती १४ टक्क्यांनी अधिक आहे. हे आकडे भारताच्या मजबूत आर्थिक धोरणांचे, जागतिक गुंतवणूकदारांच्या विश्वासाचे आणि सुधारणांसाठी केल्या गेलेल्या उपाययोजनांचे स्पष्ट प्रतीक आहेत.

मागील आर्थिक वर्षात भारतात सर्वाधिक एफडीआय सिंगापूरमधून प्राप्त झाला, तर राज्यांच्या बाबतीत सर्वाधिक एफडीआय महाराष्ट्राने मिळवला असून त्याचा हिस्सा एकूण गुंतवणुकीपैकी ३९ टक्के इतका होता. त्यानंतर कर्नाटक (१३ टक्के) आणि दिल्ली (१२ टक्के) या राज्यांचा क्रमांक लागतो. २०२३-२४ च्या तुलनेत एफडीआयमध्ये १४ टक्क्यांची वाढ झाली असली, तरी भारतासारख्या मोठ्या देशासाठी ही वाढ पुरेशी मानली जाऊ शकत नाही. कारण, आर्थिक विकासासाठी अधिक मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीची आवश्यकता आहे. भारतात एफडीआयमध्ये अपेक्षेपेक्षा कमी वाढ होण्याचे मुख्य कारण म्हणजे, चीनकडून होणार्या गुंतवणुकीवर लागू असलेली अंशतः बंदी. चिनी कंपन्यांना भारतात गुंतवणुकीसाठी विशेष तपासणी करावी लागत आहे. यावर उपाय म्हणून अलीकडेच नीती आयोगाने अशा नियमांमध्ये शिथिलता सुचवली आहे.

सध्या चीनमधून गुंतवणूक करणार्या कंपन्यांना भारत सरकारच्या गृह व परराष्ट्र मंत्रालयांकडून सुरक्षेसंदर्भातील मंजुरी घेणे बंधनकारक आहे; पण नीती आयोगाने सादर केलेल्या नव्या प्रस्तावानुसार, चिनी कंपन्या भारतीय कंपन्यांमध्ये २४ टक्क्यांपर्यंत भागीदारी अनुमतीशिवाय घेऊ शकतात. एफडीआय वाढवण्यासाठी भारत सरकार या धोरणात्मक सवलती देण्याचा विचार करत आहे. हे प्रस्ताव बंधनकारक नसले, तरी भारत-चीन संबंधांमध्ये सुधारणा घडवण्यासाठी आलेल्या या सूचनेचे विशेष महत्त्व आहे.

आज अनेक परदेशी कंपन्या उत्पादन व औषधनिर्मिती क्षेत्रात स्वतंत्र गुंतवणूक करू शकतात, तर संरक्षण, बँकिंग, मीडिया यांसारख्या संवेदनशील क्षेत्रांमध्ये काही मर्यादा कायम आहेत. नियमांतील कडकपणामुळेच २०२३ मध्ये चीनमधील बीवायडी कंपनीने एक अब्ज डॉलरसह प्रस्तावित केलेले विद्युत वाहन क्षेत्रातील संयुक्त उपक्रम (जॉइंट व्हेंचर) रद्द केले होते. आणखी एक मुद्दा म्हणजे, युक्रेन-रशिया युद्धामुळे जागतिक पातळीवर एफडीआयमध्ये घट झाली आहे; मात्र भारतात झालेल्या घसरणीचे मुख्य कारण म्हणजे, चीनकडून येणार्या गुंतवणुकीत अडथळे निर्माण होणे होय. याशिवाय भारतातील एफडीआय घसरणीचे आणखी एक कारण म्हणजे, भारतीय कंपन्यांकडून परदेशात होणार्या गुंतवणुकीत झालेली वाढ होय, ज्याला बाह्य प्रत्यक्ष गुंतवणूक (ओएफडीआय) असे म्हणतात.

या प्रकारच्या गुंतवणुकीमुळे देशाला अनेक फायदे मिळतात. रिझर्व्ह बँकेनुसार, २०२५च्या जून महिन्यात भारताची परदेशातील ओएफडीआय ५.०३ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे, जी मागील वर्षीच्या जून महिन्यात २.९ अब्ज डॉलर होती. मे २०२५ मध्ये ही गुंतवणूक २.७ अब्ज डॉलर होती. सिंगापूरमधील २.२१ अब्ज डॉलरची ओएफडीआय पाहता हा देश भारताचा सर्वोच्च गुंतवणूकदार ठरला आहे. एका देशातील कंपनी दुसर्या देशात जी थेट गुंतवणूक करते, तिला प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक म्हणतात. अशा प्रकारच्या गुंतवणुकीत गुंतवणूकदारांना संबंधित कंपनीच्या व्यवस्थापनात काही अंशतः हक्क मिळतात. भारत या माध्यमातून केवळ आर्थिक नव्हे, तर राजकीय, संरक्षण, आणि सांस्कृतिक क्षेत्रातही हितसंबंध प्रस्थापित करतो.

# लाडक्या बहिणींनो! सरकारच्या अकलेच्या तमाशावर थिरकू नका आमिषाचं षडयंत्र रचून तुमच्या भावनांशी खेळतंय

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांना आर्थिक मदत पुरवण्यासाठी सुरु केलेली एक महत्त्वपूर्ण योजना आहे. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य वाढवणे आणि सर्वांगीण विकास साधणे म्हणजेच राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करून कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करणे या उद्दिष्टांचा बनाव करून महाराष्ट्र सरकारने २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी लाडकी बहीण योजना सुरू केली होती.

महाराष्ट्रातील 'लाडकी बहीण योजना' निवडणुकीपूर्वी महिलांना भुलवण्यासाठी वापरण्यात आलेले एक षडयंत्र आहे. त्याद्वारे १५०० हप्ता देण्यात आला. मात्र, निवडणुकीनंतर निधीअभावी हप्ते थकले. योजनेमुळे राज्याची आर्थिक स्थिती विस्कटली. यामुळे इतर खात्यांचा निधी वळवला जात आहे. सरकारच्या या आर्थिक कोंडीमुळे लाडक्या बहिणींमध्ये नाराजी असून, २१०० चा हप्ता तर कोसो दुरच राहिला, पण सध्या १५०० चाही पत्ता नाही. राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत असून सरकार फक्त आश्वासने देत आहे. ही 'लाडकी बहीण योजना' फक्त निवडणुकीसाठी वापरलेला फसवणुकीचा प्रकार आहे, असं म्हणायला हरकत नाही.

सध्या महायुती सरकारमधील तिन्ही भावांना लाडक्या बहिणींचा विसर पडल्याचं दिसून येत आहे. मे आणि जून महिन्याचा हप्ता काही लाडक्या बहिणींना अद्याप मिळालेला नाही, असं लाडक्या बहिणींची ओरड सुरु आहे. योजनेच्या तांत्रिक बाबींमुळे बहिणींच्या खात्यात हप्ता येणे थकले आहे. आता, ज्यांच्या कौटुंबिक उत्पन्नात वार्षिक एक लाख रुपये येतात, त्यांना या योजनेतून वगळण्यात येईल असे म्हणतात. तुम्ही कोणतंही काम कराल तरी महिन्याला दहा हजार रुपये इतका पगार मिळतोच आणि प्रत्येक कुटुंबात एखादा तरी दहा हजार रुपये कमावणारा असतोच असतो. म्हणजे 'काम झालं माझं आणि काय करू तुझं' या उक्तीप्रमाणे इतर निकषांच्या आधारे कित्येक लाडक्या बहिणींना वगळण्याचा प्लॉन आहे. यावरून सिद्ध होते की, ही 'लाडकी बहीण योजना' फक्त निवडणुकीसाठी वापरलेला फसवणुकीचा प्रकार होता.

दुस-या राज्याची संकल्पना उचलून महाराष्ट्रात महायुती सरकारने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात 'लाडकी बहीण योजना' जाहीर केली आणि विधानसभा निवडणुकीच्या काही महिने आधी राज्यभरातील बहिणींना ३ महिन्यांचे प्रत्येकी १५०० प्रमाणे ४५०० खात्यात देऊन लाडक्या बहिणींच्या मतांची भाऊबीज आपल्या ओंजळीत घेतली. पण हीच 'लाडकी बहीण योजना' आता पुन्हा निवडून आल्यावर राज्य सरकारला महागात पडत आहे. या योजनेद्वारे सुमारे दीड कोटी बहिणींना निधी वाटण्यात आला आणि नंतर कळले की निकषात न बसणा-या बहिणींनाही हा निधी घेण्याचा मोह आवरला नाही. त्यामुळे राज्याची आर्थिक स्थिती विस्कटली. सध्या राज्याची आर्थिक अवस्था 'आमदनी अठुनी खर्चा रुपया' अशी झाली आहे.

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल अर्थसंकल्प अधिवेशनाच्या काळात विधिमंडळात मांडला. या अहवालात लाडकी बहीण योजनेची माहिती देण्यात आली. या योजनेत जून २०२४ पासून डिसेंबर २०२४ या ७ महिन्याच्या कालावधीत २ कोटी ३८ लाख लाभार्थी बहिणींना निधी देण्यात आला. हा निधी तब्बल १७,५०५ कोटी रुपये इतका होता.

'लाडकी बहीण योजना' ऐन निवडणुकीच्या तोंडावर जाहीर केल्यामुळे सरकारने होता नव्हता निधी वापरला. मात्र, पुन्हा निवडून आल्यावर काय करायचे? याचा विचार बहुधा केला गेला नाही. त्यातच पुन्हा सरकार यावे या हेतुने १५०० चा हप्ता थेट २१०० करण्याचे आश्वासन दिले आणि महायुती सरकार मोकळे झाले. राज्यातील बहिणींनी त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना पुन्हा निवडून दिले. त्यानंतर मात्र महायुती सरकारची पंचायत होऊ लागली. या योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूदच केलेली नव्हती. मग काय, आर्थिक ताळमेळ बसवण्यासाठी इतर खात्यातील निधी वळवण्याची व पळवण्याची वेळ आली. लाडक्या बहिणींना एप्रिल महिन्याचा हप्ता ७ मे दरम्यान देण्यात आला होता. आता, मे ते जुलै महिन्याचे ४५०० कधी मिळणार, याची प्रतिक्षा आहे. दरम्यान, अर्थमंत्री अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेत चूक झाल्याचे जाहीर केले. त्यामुळे निधी मिळणार की नाही, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. लाडकी बहीण योजनेत १५०० चा हप्ता २१०० कधी होणार हे तर दुरच राहिले. आता १५०० तरी मिळणार की नाही, असा प्रश्न लाभार्थी बहिणींना पडत आहे.

राज्यासमोर आर्थिक संकट वाढत आहे. महसुली उत्पन्नापेक्षा खर्च जास्त आहे. कर्ज व व्याजापोटी मोठी रक्कम खर्च होत आहे. भांडवली खर्चासाठी दुसरे कर्ज काढण्याशिवाय पर्याय नाही. आर्थिक पाहणी सर्वेक्षण अहवालातून राज्याची गंभीर स्थिती समोर आली आहे. म्हणजे खर्चाच्या तुलनेत उत्पन्न कमी आहे. कर्ज आणि व्याजापोटी राज्यावरील कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. यामुळे खर्च भागवताना अडचणी येत आहे. दरम्यान, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सरकारी कर्मचा-यांना लाभ बंद केल्याबाबतची माहिती दिली. ५ महिन्यांपूर्वी लक्षात आले की सरकारी महिला कर्मचारी लाभ घेत आहेत. त्यामुळे त्यांना बंदी घालण्यात आली. आता तर महिला आणि बालविकास विभागाने केलेल्या ऑडिटमध्ये असे आढळून आले आहे की, लाडकी बहीण योजनेअंतर्गत १४,००० हून अधिक पुरुषांनी फसवणूक करून आर्थिक लाभ मिळवले आहेत. ऑडिटमध्ये असे म्हटले आहे की या योजनेअंतर्गत १४,२९८ पुरुषांना २१.४४ कोटी रुपये वितरित करण्यात आले. पण जेव्हा सरकारी महिला कर्मचारी आणि पुरुष लाभ घेत होते, तेव्हा निकष तपासणारे काय करत होते? त्यामुळे या पुरुषांवर कार्यवाही होणार का आणि त्यांच्याकडून दिलेली रक्कम वसूल करण्यात येईल का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.


आतापर्यंत सर्वच निकषांच्या आधारे अर्जाची पडताळणी सुरू होती. त्यामुळे जवळपास ५० लाख बहिणींना वगळण्यात आले. ही पडताळणी पुढेही सुरू ठेवली असती, पण येणा-या मनपा, नप, जिप, पंस व ग्रापं निवडणुकीचा विचार करता ही प्रक्रिया तात्पुरती बंद करण्यात आली. एवढेच नव्हे तर रक्षाबंधनचे औचित्य साधून ज्या बहिणींचे मे पासूनचे हप्ते थकले, त्यांना मे ते ऑगस्ट असे ४ महिन्यांचे प्रत्येकी १५०० प्रमाणे ६००० तर चालू बहिणींना जुलै व ऑगस्ट असे २ महिन्यांचे प्रत्येकी १५०० प्रमाणे ३००० देऊन आमिषांच्या षडयंत्रात अडकवण्याचा प्रयत्न सुरु आहे. परंतु लाडक्या बहिणींच्याही आता लक्षात येऊ लागले आहे की, हे महायुतीचे सरकार फसवे आहे. म्हणून लाडक्या बहिणींनो सरकार कोणतीही अक्कल लढविली, तरी त्यांच्या अकलेच्या तमाशावर थिरकू नका आणि त्यांच्या चक्रव्युहात अडकू नका.

तसं पाहता महायुती सरकारमध्ये जनतेला फेस करण्याची ताकद उरली नाही. म्हणूनच तर जन सुरक्षा विधेयक पारीत करून सामान्य जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा व सर्वाधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. पण लाडक्या बहिणींनो तुमच्यात हे विधेयक हाणून पाडण्याची ताकद आहे. त्यामुळे ते पारीत होण्यापूर्वीच हाणून पाडा. एकदा का हे विधेयक पारीत झाले तर मग कोणत्याच गोष्टीसाठी तुम्ही लढू शकणार नाही. त्यामुळे आताच जागे व्हा, उठा आणि लढा..!

**************

शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमनध्वणी-७०५७१८५४७९

# अण्णा भाऊ साठे : एक बहुआयामी व्यक्तिमत्व प्राचार्य डॉ.श्रीधर कोल्हे जयक्रांती वरिष्ठ महाविद्यालय लातूर



आज लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची १०५ वी जयंती... त्या जयंतीनिमित्त त्यांच्या साहित्यिक कार्याची महती संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे. अण्णा भाऊ साठे यांनी कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, पोवाडा, शाहिरी काव्य अशी साहित्य निर्मिती करुन मराठी साहित्यात स्वतःचा वेगळा ठसा उमटवला आहे. साहित्याच्या माध्यमातून त्यांनी मराठी साहित्याला एक आगळे वेगळे वैभव प्राप्त करुन दिले आहे. त्यांच्या साहित्याचे मूल्य अधोरेखित करताना एक महत्त्वाची गोष्ट सांगावीशी वाटते की, त्यांच्या 'वैजयंता', 'आवडी', 'माकडीचा माळ', 'फकिरा', 'चिखलातील कमळ', 'वारणेचा वाघ' आणि 'अलगुज' इत्यादी कादंबऱ्यांवर चित्रपटाची निर्मिती होऊन त्यांना राज्य शासनाचे पुरस्कारही प्राप्त झालेले आहेत. अण्णा भाऊ साठे हे मुळातच मानवतावादी दृष्टिकोन असलेले साहित्य. त्यामुळेच इथल्या समाज व्यवस्थेने कंजारभट जातीतील लोकांना नेहमीच गाव कुसाबाहेर ठेवले होते, हे लोक अन्यायविरुद्ध कशाप्रकारे लढतात. याचे चित्र अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून रेखाटले आहे. 'बरबाद्या कंजारी', 'बोलकं मुंडकं' मधील पिऱ्या, 'स्मशानातील सोनं' मधील भीमा, वेड लावणारी डोंबाऱ्याची बिलवरी, निष्पाप बापाच्या आत्महत्येचा बदला घेणारी 'निखारा' मधील फुला. अमरावतीच्या तुरुंगात भाकरीसाठी बेड करणारे भोमय्या आणि सुलतान, जे स्वातंत्र्य माझ्यात कवडीचाही बदल करु शकत नाही ते स्वातंत्र्य कसे म्हणता येईल, असे म्हणणारा कोंबडी चोर रामू, वारण्याच्या खोऱ्यातील अनेक स्त्रियांचे उध्वस्त झालेले जीवन पुन्हा उभे करणारे सावळा आणि सत्तू इत्यादी नायक-नायिका अन्यायाच्या विरोधात उभ्या केल्या करून समाजापुढे एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

आपल्या देशामध्ये सुख उपभोगणारे बोटावर मोजण्या इतपतच काही लोकच होते तर दुसऱ्या बाजूला दुःख, दारिद्र्य, अंधश्रध्दा यांच्या खाईत खितपत पडलेले गोरगरीब होते. समाज व्यवस्थेने माणसा-माणसात निर्माण केलेला हा भेदभाव अण्णा भाऊंनी अचूक ओळखला होता. त्यामुळे बहुजन समाजातील नायक - नायिका आपल्या साहित्यातून उभ्या करून त्यांच्या समस्यांचे दर्शन घडविले होते. अण्णा भाऊंनी मराठी साहित्यात अत्यंत मोलाची घातलेली आहे. एकापेक्षा एक साहित्य कृती निर्माण केल्या. 'फकिरा' 'वारणेचा वाघ', 'मास्तर', 'अलग्ज', 'मूर्ती', 'मगला' यासारख्या ३२ कादंबऱ्या, 'बरबाद्या कंजारी', 'लाडी', 'आबी', 'निखारा', 'खुळवाडी 'गजाआड', 'फरारी', 'चिरागनगरची भूत' अशी १३ कथा संग्रह 'इनामदार', 'पेंग्याचे लगीन', 'सुलतान' ही तीन नाटके, 'अकलेची गोष्ट 'खापऱ्या चोर', 'देशभक्त वाटोळे', 'बिलंदर बुडवे', 'माझी मुंबई 'शेटजीचे इलेक्सन' अशी अकरा लोकनाट्य, 'शाहिरी', 'माझा रशियाचा प्रवास' हे प्रवासवर्णन ही सर्व साहित्य संपदा आहे. अण्णा भाऊच्या सहा कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले, परंतु अण्णा भाऊंना त्यात पैसा नाही. पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईत गेल्यावर घरगडी, माळी, गिरणी कामगार म्हणून कामे करावी लागली. या आधुनिक श्रीमंत मुंबईत उच्च नीचतेची दरी होती.

अण्णा भाऊ साठे मार्क्सवादी तत्त्वज्ञानाकडे वळले. साहजिकच त्यांना साहित्य हे मार्क्सवादी तत्त्वज्ञानी विचारांनी निर्माण करायाचे होते.त्यांच्या साहित्यातील घटना, व्यक्तिरेखा मन हादरून टाकणाऱ्या, दुःखाने, वेदनेने फुललेल्या आहेत. अण्णांच्या कादंबरीत विद्रोह, संघर्षशील व निर्भीड वृत्तीचे दर्शन घडते. प्रादेशिक, ग्रामीण, झोपडपट्टीतील दलित, शोषित, आदिवासी, गिरीजन, गुन्हेगार व त्यांचे जीवन दिसते.



अण्णा भाऊंच्या कथा पाहिल्या तर त्यांच्या कथेमधून शोकात्मकता दिसून येते. त्यांच्या कथेचे नायक हृदयद्रावक आणि शोकात्य स्वरुपात दिसतात. त्यांच्यात 'संघर्षता' हा गुण दिसून येतो. नियतीने ज्यांची क्रूर चेष्टा केली. समाजाने ज्यांना अव्हेरले तरीही स्वबळावर जगुन समाजावर आपले प्रस्थ राखून आहेत. अण्णा भाऊच्या आयुष्यात काही चांगली तर काही वाईट माणस भेटली. त्या माणसांना त्यांनी आपल्या साहित्यातील नायक बनवून त्यांचा संघर्ष जगापुढे दर्शविला. अशा प्रकारे अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक कार्याला मानाचा मुजरा...

# शिक्षणाचा विचका

राजस्थानातील एका अत्यंत महत्त्वाच्या आणि सगळ्यांत गंभीर आणि धक्कादायक घटनेकडे दुर्लक्ष झाले. राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यात शाळेच्या एका जीर्ण झालेल्या इमारतीचे छप्पर कोसळले आणि त्यात सात लहान मुलांचा मृत्यू झाला. ज्यांनी आपली मुले या घटनेत गमावली त्यांचा आक्रोश ही अन्य लोकांसाठी अथवा सरकारी व्यवस्थेसाठी केवळ काही क्षण अथवा तास पाहावी आणि ऐकावी लागेल अशी घटना आहे, असे मानण्याइतपत कोडगेपणा आता सगळ्यांच्याच अंगात भिनला आहे. आपल्याला सोपवलेले काम पूर्ण मन लावून करावे, निष्ठेने आणि प्रामाणिकपणे करावे असे ज्या शाळेत शिकवले जाते त्या शाळेत जर निरागस मुले मृत्यू पावत असतील तर हे शिकवणारे आणि शिकवण्यासाठी त्यांना आणणारे यांना सगळ्यांनाच आपापल्या जबाबदार्यांचा विसर पडला आहे हे स्पष्ट आहे. आम्ही धोकादायक शाळांची जी यादी मागितली होती त्यात कथित शाळेचे नावच नव्हते असे अधिकार्यांनी म्हटले. एवढे रूक्ष उत्तर त्यांना सात मुलांच्या अकाली मृत्यूतून सुटका करून देण्यासाठी पुरेसे ठरणार असल्याचे सध्यातरी दिसते.

ते एकवेळ हात झटकून मोकळे होतील किंवा तसे करू शकतील, मात्र ज्या शाळेत ती मुले शिकत होती तेथील शिक्षकांना हा धोका जाणवला नाही? या शिक्षकांना स्वत:च्या जीवाचीही भीती वाटली नाही? ते शाळेत नक्की जात होते ना ज्ञानदानाच्या कामाला की त्यांचा बहुमूल्य वेळ त्यांनी अन्य महत्त्वाच्या कामांसाठी राखून ठेवला होता? घटना एका ठिकाणी घडली असली तरी पहिली नाही आणि आपली जाड कातडी जोपर्यंत संबंधितांकडून बाजूला सारली जात नाही तोवर शेवटचीही नसणार आहे. देशातील प्रत्येक राज्यात हीच अवस्था थोड्याफार फरकाने आहे. देशाला महाशक्ती करण्याच्या चर्चा होतात, त्या व्हाव्यात त्याला विरोध नाही मात्र आज आपण नेमके कुठे उभे आहोत याकडेही लक्ष देण्याची तसदी वरपासून खालपर्यंत सगळ्यांनी घ्यायला हवी. भारतातील अनेक ग्रामीण शाळांना पायाभूत सुविधांच्या आव्हानांना तोंड द्यावे लागते. इमारतींची खराब स्थिती, मूलभूत सुविधांचा अभाव याचा शैक्षणिक वातावरणावर नकारात्मक परिणाम होतो इतपत ठीक होते, मात्र आता सुरक्षिततेवरही



त्याचा परिणाम होतो आहे. शहरी भागांच्या तुलनेत ग्रामीण भागातील स्थिती अधिक खराब आहे. अनेक शाळांमध्ये स्वच्छ पाणी, शौचालये, वीज आणि पुरेशा वर्गखोल्या यासारख्या मूलभूत गोष्टी नाहीत. त्यातून गळती वाढते किंवा अपार संघर्ष करत मुलींना शिक्षण घ्यावे लागते. गळकी छप्परे, पडण्याच्या बेतात आलेल्या भिंती आणि अपुरी जागा अशा अवस्थेत शिक्षण सुरू आहे. विद्यार्थ्यांना त्यातच आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करून स्वत:चा विकास करवून घ्यायचा असतो. जोपर्यंत येथील विद्यार्थी मोठ्या शहरांत आणि व्यापक जगात दाखल होत नाहीत तोपर्यंत चालून जाते, पण ज्यावेळी ते स्पर्धेमध्ये उतरतात त्यावेळी त्यांना आपण किती मागे आहोत याची जाणीव होते आणि यात त्यांचा दोष नसतो. अर्थात ज्या विद्यार्थ्याला याचे म्हणजे शिक्षणाचे महत्त्व समजले असते त्यालाच याची जाणीव होते. परिस्थितीमुळे आणि त्याच्या भागात सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रशासकीय यंत्रणेच्या उदासीनतेचा त्याला फटका सहन करावा लागतो; मात्र त्याला थांबता येत नाही. सगळ्या अडथळ्यांवर मात करत त्याला दुप्पट वेगाने आणि प्रसंगी जीवाच्या आकांताने धावावे लागते.

पात्र आणि लायक शिक्षक मिळत नाहीत. शिक्षकांना आपल्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडत अन्यत्र फरफटत जाण्याची तयारी नसते. विद्यार्थी हा त्यांचा केंद्रबिंदूच नसल्याचे बहुतांश शिक्षकांच्या वर्तणुकीत आढळून येते. सगळेच शिक्षक या वर्गात मोडतात असे नाही, मात्र चांगल्या शिक्षकांची आणि व्रत म्हणून शिक्षकी पेशा स्वीकारल्याची संख्या आता खरेच किती राहिली असेल याचे संशोधन प्रत्येकाला सहज करता येऊ शकते. अशा एकूणच निराशाजनक वातावरणात शिक्षणाबद्दल आपण अनुकूलता निर्माण करत आहोत की प्रतिकूलता याचाही गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. माझ्या शहरात अथवा माझ्या तालुक्यात मी असले काही पाहिले नाही म्हणून सगळीकडे सर्वकाही सुरळीत सुरू आहे आणि अत्यंत उच्च दर्जाच्या वातावरणात सगळे शिकत आहेत आणि येथे तयार होणारे विद्यार्थी उद्या राष्ट्राचे भविष्य घडवणार आहेत या स्वप्नरंजनात आताच्या काळात कोणीही न राहिलेलेच बरे. झालावाडसारखी एखादी घटना घडली की राज्य प्रशासन फतवा काढून तपासणीचे आदेश जारी करते. काही राज्ये जागरूक असतात. अन्य राज्यात एखादी घटना घडली की ते तातडीने आपल्या राज्यात पुढाकार घेत स्वत:हून तपासणीची मोहीम सुरू करतात. मात्र त्यात प्रामाणिकपणाने काम करण्यापेक्षा दिखावाच अधिक असतो. बरे सरकार प्रामाणिक असेलही तरी खाली काम करणारी मंडळी पाट्या टाकणार नाहीत याची शाश्वती कोणी देऊ शकत नाही. याकरताच या आव्हानांना तोंड देण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे, ज्यामध्ये पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे, पुरेशी शिक्षण संसाधने उपलब्ध करणे आणि पुरेशा संख्येने पात्र शिक्षक मिळणे अथवा मिळवणे महत्त्वाचे आहे. दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना आवश्यक कौशल्ये आणि ज्ञानाने सुसज्ज करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये गुंतवणूक करणे जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच व्यावहारिक कौशल्ये शिकवण्यासाठी अभ्यासक्रमाचे आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. सर्व मुलांना, त्यांची पार्श्वभूमी काहीही असो, दर्जेदार शिक्षण सुरक्षित वातावरणात उपलब्ध व्हावे. अन्यथा विकसित भारताचा संकल्प आणि त्यासंदर्भात केलेल्या घोषणा या केवळ आणि केवळ सोपस्काराचा भाग ठरेल.

# मी अत्यंत खूश.! कृषी खाते काढून घेतल्यानंतर माणिकराव कोकाटे पुन्हा बरळले

पुणे : मागील आठवड्यापासून अजित पवार गटाचे नेते माणिकराव कोकाटे हे वादाच्या भोवऱ्यामध्ये अडकले आहेत. माणिकराव कोकाटे हे अनेकदा त्यांच्या वादग्रस्त विधाने यामुळे चर्चेत असतात.

यानंतर माणिकराव कोकाटे हे तब्बल २२ मिनिटे विधीमंडळाच्या सभागृहामध्ये जंगली रमी खेळताना दिसून आले. यानंतर आता माणिकराव कोकाटे हे विधीमंडळात गेम खेळल्यानंतर त्यांना क्रीडा हे खाते देण्यात आले आहे. यावर आत माणिकराव कोकाटे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



माणिकराव कोकाटे यांनी अनेकदा शेतकऱ्यांबाबत असंवेदनशील वक्तव्ये केली आहेत. यानंतर त्यांनी विधानसभेच्या सभागृहामध्ये जंगली रमी गेम खेळली. दुर्दैवाने महाराष्ट्र राज्य हे शेतकरी आत्महत्येमध्ये देशामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. असे असताना कृषीमंत्री गेम खेळत असल्यामुळे टीका केली जात होती. त्याचबरोबर माणिकराव कोकाटे यांनी शासनाला भिकारी देखील म्हटले होते. यावरुन त्यांच्याकडून कृषी खाते काढून घेण्यात आले आहे. यावर प्रतिक्रिया देताना माणिकराव कोकाटे यांनी खूप आनंदी असल्याचे वक्तव्य केले आहे.

राजकीय बातम्या वाचण्यासाठी क्लिक करा

पुण्यामध्ये मंत्री माणिकराव कोकाटे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना कृषीमंत्रिपद काढून घेतल्याबाबत माध्यमांनी प्रतिक्रिया विचारली. यावेळी माणिकराव कोकाटे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जो निर्णय घेतला तो मला मान्य आहे. माझी वाटचाल पुढे चालू राहणार आहे, अशा भावना माणिकराव कोकाटे यांनी व्यक्त केल्या.

त्याचबरोबर माणिकराव कोकाटे यांना क्रीडा क्षेत्र देण्यात आले असून कृषी क्षेत्र हे अजित पवारांचे विश्वासू असलेले दत्तात्रय भरणे यांना देण्यात आले आहे. याबाबत प्रतिक्रिया देताना माणिकराव कोकाटे म्हणाले की, दत्तात्रय भरणे हे शेतकरी पुत्र आहेत, त्यांना मी मदत करेन. त्यांना हे खाते सोपवल्यामुळे खात्याला न्याय मिळेल. जेव्हा गरज पडेल, तेव्हा मी दत्तात्रय भरणे यांची मदत करेन. मी नाराज नाही, मी अत्यंत खूश आहे, अशी प्रतिक्रिया माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे. त्यांच्या या वक्तव्याची राजकीय वर्तुळामध्ये चर्चा सुरु आहे. त्यामुळे आता पुन्हा माणिकराव कोकाटे हे अडचणीत येण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रसंबंधित बातम्या वाचण्यासाठी क्लिक करा

महायुतीमधील अनेक नेते वादग्रस्त विधाने करत आहेत. त्याचबरोबर मंत्रिमंडळामध्ये असणाऱ्या नेत्यांच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे. धनंजय मुंडे हे बीडमधील वाढत्या गुन्हेगारीमुळे अडचणीत आले. तर माणिकराव कोकाटे हे थेट शासनाला भिकारी म्हणाले. धनंजय मुंडेंचा राजीनामा घेण्यात आला तर माणिकराव कोकाटे यांचे खाते बदलण्यात आले. याबाबत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, माणिकराव कोकाटे हे आमचे ज्येष्ठ आहेत. वरिष्ठांनी त्यांना मंत्रिपद दिलं हे योग्यचं आहे. तर धनंजय मुंडे यांनी मंत्रिपद मागणी केली याची मला कल्पना नाही, असे म्हणत या विषयांवर जास्त बोलणे दत्तात्रण भरणे यांनी टाळले आहे.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लो.टिळक पुण्यतिथी साजरी.

केज/प्रतिनिधी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज शाळेत शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सुदाम सरवदे, उपाध्यक्षा सौ सीमा सुधीर मोहिते, अपग्रेड मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले . लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जन्म दि १ ऑगस्ट १९२ रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे झाला.त्यांचे मुळ नाव डॉ.तुकाराम भाऊराव साठे हे होते.आईचे नाव वालुबाई होते.ते अस्पृश्य समाजात जन्मलेले दलित होते.ते भारतातील समाजसुधारक,लोककवी,लेखक, कादंबरीकार, साहित्यरत्न, लोकशाहीर होते.त्यांनी बहुजनांच्या हितासाठी कार्य करून समाज जागृती केली.त्यांचा कार्याचा आदर्श घेण्यासारखे त्यांनी कार्य केले. लोकमान्य टिळक यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यात २३ जुलै १८५६ रोजी झाला. आईचे नाव पार्वतीबाई होते.ते भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वाचे नेते होते. ते स्वातंत्र्य सेनानी, पत्रकार, समाजसुधारक होते.त्यांनी केसरी व मराठा हे वृत्तपत्र सुरु केले व समाज जागृती केली.स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारी ही त्यांची घोषणा होती.त्यांचा मृत्यू दि.१ ऑगस्ट १९२० रोजी झाला. असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले. या शाळेतील शिक्षक श्री बाळासाहेब भिल्लु राठोड सर, श्री बाबासाहेब राजाराम मैंद सर, श्री भारत बाबुराव हांगे सर, श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम,




श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम,ट्रेनी शिक्षिका सौ.सीमा सुधीर मोहिते यांनी आपले मनोगत व्यक्त केले.विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी या शाळेतील आदर्श शिक्षिका श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त पुष्पहार, पुष्पगुच्छ,शाल , श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सुदाम सरवदे,उपाध्यक्षा सीमा सुधीर मोहिते, सदस्य, ज्येष्ठ नागरिक विठ्ठल तात्या माने,राधा आक्का खामकर,पीएम पोषण शक्ती निर्माण योजनाचे कामगार श्री गणेश काशिनाथ माने हे उपस्थित होते.शेवटी श्री बाबासाहेब राजाराम मैंद सर यांनी आभार मानले व कार्यक्रम संपन्न झाला.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इ.७ वी वर्गातील विद्यार्थीनी श्वेता सुहास सरवदे यांनी केले.सहकार्य अंकिता विनोद मोहिते, ज्योती श्रीराम खामकर, भाग्यश्री ओमप्रकाश मोहिते,नेहा सतीश माने,हर्षदा सतिश सानप यांनी केले.

# शाहू विद्या मंदिर शाळेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती,लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी

केज/प्रतिनिधी केज शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत साहित्यसम्राट, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती,लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व एम. टी. एस. ऑलंपियाड मधील गुणवंत विद्यार्थी सत्कार हा संयुक्त कार्यक्रम शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी. बी. यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.यावेळी मंचावर सेवानिवृत्त शिक्षक श्री. एस. ए. डापकर व ज्येष्ठ शिक्षक श्री. व्ही. बी. यादव यांची उपस्थिती होती. सर्व प्रथम लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

एम. टी. एस.ऑलंपियाड स्पर्धेतील गुणवंत चि. नीरज आकाश पवार, चि. सुरज बालासाहेब घुले, कु.समर्थ रंजित जाधव,चि. सिद्धांत राजू वंजारे, चि. सार्थक दत्तात्रय पतंगे,चि. प्रथमेश लक्ष्मण चौरे,कु. आर्या अनिल निंगूळे, कु. भक्ती धनंजय सिरसट, कु.कृष्णाई बन्सी पाटोळे, कु.तनुजा लक्ष्मण ढाकणे, कु. सृष्टी जितेंद्र रोडे, कु. श्रेया गणेश सोळंके यांचे यथोचित अभिनंदन करण्यात आले.



विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु.ज्ञानेश्वरी प्रवीण देशमुख व कु.प्रगती सत्यप्रेम तपसे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्याविषयी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम प्रसंगी शाळेतील सहशिक्षक श्री. जे. आर. मस्के यांनी विद्यार्थ्यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जीवनपट उलगडून सांगितला. तर श्री. डापकर एस. ए. यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या कार्याविषयी माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात श्रीमती चाटे बी. बी. मनोगत व्यक्त करताना सर्व गुणवंतांचे अभिनंदन करत शुभाशीष व्यक्त केले पुढे बोलताना त्या म्हणाल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी महापुरुषांचा आदर्श घेऊन देशासाठी, समाजासाठी चांगले काम करावे.आदर्श नागरिक होण्यासाठी महापुरुषांचे विचार मोलाचे काम करतात. कार्यक्रमाचे संचलन श्री. क्षीरसागर आर. एस. यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री. ए. डी. देशमुख, श्री. जी. बी. डिरंगे, श्रीमती अनिता जाधव, श्रीमती ध्वजा गायकवाड यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रम प्रसंगी सर्व विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने घेण्यात आलेली गायन स्पर्धा संपन्न

केज /प्रतिनिधी केज शहरात प्रथमच स्वर्गीय मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्त केज येथे कला क्रीडा विश्वास समितीच्या वतीने घेण्यात आलेली मोहम्मद रफी यांच्या गीत गायन स्पर्धा संपन्न झाली या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा सौ सीताताई बनसोड, भाई मोहन गुंड, शिवाजी दादा ठोंबरे ,शाहीर तुकाराम ठोंबरे, समाजसेवक हनुमंत भोसले ,आर पी आय तालुका अध्यक्ष दीपक कांबळे, या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून लाभलेले लातूर येथील चंद्रशेखर पारशेट्टी,बीड येथील सुरेश थोरात, सर सचिन राऊत सर, पुरोगामी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रंजीत घाडगे, पत्रकार तात्या गवळी, वसंत बप्पा सोनवणे, विवेक बनसोड, दिनकर जाधव, अमोल सावंत, या मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून स्पर्धेला सुरुवात झाली स्पर्धेला नागरिकांतून व स्पर्धकातून मोठा प्रतिसाद होता या स्पर्धेसाठी बऱ्याच ठिकाणाहून स्पर्धक आले होते तर या स्पर्धेत होणारे गीत ऐकण्याकरिता भरपूर संख्यांनी रसिकश्रोते उपस्थित ही स्पर्धा स्त्री व पुरुष गटामध्ये घेण्यात आली. यामध्ये एकूण ५४ स्पर्धक होते १७ महिला व३७ पुरुष यांनी सहभाग घेतला होता पुरुष स्पर्धकांनी मोहम्मद रफी यांचे गीत गाऊन व महिलांनी लता




मंगेशकर व इतर गायिकेचे गाणे गाऊन रसिकांना मंत्रमुग्ध केले या स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक लातूर येथील किशोर कांबळे, द्वितीय बक्षीस महेश, तोष्णीवाल तृतीय बक्षीस सुदर्शन शिंदे, व उत्तेजनार्थ जनार्दन वडमारे ,यांनी पटकावले व महिलां मध्ये प्रथम बक्षीस संभाजीनगर येथील दिपाली हरणे, द्वितीय बक्षीस ललिता लांडगे, तृतीय बक्षीस सुरेखा थोटे ,व उत्तेजनार्थ दीक्षा कांबळे, यांनी पटकावले या कार्यक्रमाची प्रस्तावना कला क्रीडा विश्वास समितीचे तालुका अध्यक्ष अनिल वैरागे यांनी केली व आभार उपाध्यक्ष मुनीर कुरेशी यांनी मानले. या स्पर्धे साठी कला क्रीडा विश्व समितीचे सचिव सचिन लांडगे ,बलभीम मस्के, शिवमुर्ती हजारे, कल्याण मस्के, दिलीप खाडे, अमोल सरवदे, ज्ञानेश्वर लांब, सिंधू मुळे, अनिता कसबे, छबू अंधारे ,या पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# केज शहरात अनेक ठिकाणी नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

केज/प्रतिनिधी केज शहरात विविध ठिकाणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आले. महात्मा फुले नगर,आंबेडकर नगर, हाउसिंग कॉलनी, सिद्धार्थ नगर, क्रांतीनगर यासह अनेक ठिकाणी ध्वजारोहण केज नगरपंचायत च्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या हस्ते संपन्न झाले. महात्मा फुले नगर,आंबेडकर, नगर,हाउसिंग कॉलनी येथे कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांचे प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गटनेते राजूभाई इनामदार तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेविका सौ पद्मिनी आकाश शिंदे, युवा नेते लखन हजारे, जनविकास फाउंडेशनचे विजय लांडगे, पत्रकार तात्या गवळी, दैनिक बीड युवामतचे संपादक अशोक नागरगोजे, युवा नेते अशोक गायकवाड, दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष रोहित कसबे, ज्येष्ठ नागरिक राजाभाऊ लांडगे, मेजर लक्ष्मण जोगदंड, कैलास लांडगे, राजूबाई थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करून महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. यावेळी जयंती उत्सव समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त महात्मा फुले नगर, आंबेडकर नगर, हाउसिंग कॉलनी, सिद्धार्थ नगर, क्रांती नगर यासह शहरातील विविध भागांमध्ये मागील चार ते पाच दिवसापासून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. केज शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या हर्षउलासाच्या वातावरणामध्ये साजरी करण्यात आली. गुरुवार रोजी सकाळी ठीक ११–०० वाजता केज शहरातील विविध भागातील सर्व जयंती उत्सव समितीच्या वतीने मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. मोटर सायकल रॅलीची सुरुवात शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चौकात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सुरुवात करण्यात आली. सदर रॅली हे मंगळवार पेठ कॉर्नर मार्गे शहरातील मुख्य रस्त्याने छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे, कळम रोड रोजा मोहल्ला कमान मार्गे, फुलेनगर,आंबेडकर नगर, हाउसिंग कॉलनी मार्गे संविधान चौक मार्गे मुख्य रस्त्याने छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे हैदराबाद बँक रोड, डॉ.आंबेडकर चौक मार्गे भीम नगर, सिद्धार्थ नगर येथे मोटरसायकल रॅलीचा समारोप करण्यात आला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रथमच मोटर सायकल रॅली काढण्यात आली होती. सदर रॅलीमध्ये सर्व समाजातील युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते शहरात भव्य अशी प्रथमच मोटर सायकल रॅली काढण्यात आल्यामुळे ठिकठिकाणी नागरिकांची गर्दी रॅली पाहण्यासाठी जमली होती. केज शहरातील मुख्य रस्त्यासह विविध ठिकाणी महामानवांच्या चौकास पुष्पहार अर्पण करण्यात आले.

# परळीत दहशत माजविणारी मोठी टोळी अजूनही सक्रिय: खा.बजरंग सोनवणे



बीड/प्रतिनिधी परळीत महादेव मुंडे यांची हत्या होते परंतु २१ महिन्यात पोलीसांना आरोपी सापडत नाहीत. आरोपी पोलीसांच्या नाकावर टिच्चून परळीत फिरतात. हे कोणाच्या आशीर्वादाने चालते. परळीत ज्याला मारले त्यांच्यावरच खोटे गुन्हे दाखल केले जातात, त्यांनाच जेलमध्ये टाकले जाते. परळीत दहशत माजविणारी अजूनही मोठी टोळी बाहेर सक्रीय असल्याचा आरोप खा.बजरंग सोनवणे यांनी केला. बीड येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत महादेव मुंडे यांच्या कुटूंबियांना न्याय देण्याच्या लढ्याची दिशा ठरविण्यासाठी सर्वधर्मिय बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी आ.संदीप क्षीरसागर, आ.प्रकाश सोळंके, शिवसेना जिल्हाप्रमूख सचिन मुळूक, अनिल जगताप, बाळा बांगर, कुंडलिक खांडे, संतोष जाधव, हनुमान मुळीक, शेख शफीक, राजाभाऊ फड यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, महाराष्ट्रात जिथे अन्याय होतो, तिथे मनोज जरांगे पाटील आणि जिथे पाटील तिथे आम्ही उभा आहोत. आज महादेव मुंडे यांची पत्नी आपल्या सर्वांची ही बहीण २१ महिन्यापासून न्याय मागत आहे. त्यांच्या मागणीचा कोणी विचारत नाही. आज काही खून समोर आले आहेत. परंतु त्यांच्या मारेकऱ्यांना अटक होत नाही. मग मुख्यमंत्री काय करतात. परळीत तेच मारणार आणि तेच खोटे गुन्हे दाखल करत आहे. यामुळे कोणी तरी समोर येऊन बोलणे आवश्यक आहे. बाळा बांगर यांनी पुढे येऊन मांडणी केली आहे. काल मुख्यमंत्र्यांनी एसआयटी स्थापन केली पण त्याची ऑर्डर येईपर्यंत त्यांचे काही खरे मानू नका. एसआयटीमध्ये पंकज कुमावत आले तर दूध का दूध, पाणी का पाणी होईल. दरम्यान, कालपासून महादेव मुंडे प्रकरणात काही आरोपींना अटक झाल्याचे सांगितले जात आहे. परंतु कोणालाही अजून अटक झाली नाही. पोलीस यंत्रणाच अशी अफवा पसरवित असावी. परळीतील पोलीस गेंड्याचे कातडे पांघरून फिरत आहेत. केवळ पोलीस अधिक्षक आणि जिल्हाधिकारी बदलून चालणार नाही तर खालची यंत्रणा देखील बदलली पाहिजे. आज सुद्धा परळीची टोळी सक्रिय आहे. जेलमध्ये देखील त्यांना सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. बीडचा खासदार म्हणून मी कायम या लढ्यात सोबत आहे. मनोज जरांगे पाटील हे देतील तो आदेश पाळून आम्ही काम करू, असा शब्दही बजरंग सोनवणे यांनी दिला.

# लहुजी शक्ती सेना नेरुळ यांच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

नवी मुंबई / के. एच. हनवते :– १ ऑगस्ट २०२५ रोजी कुकशेत गाव न्यू इंग्लिश मिडीयम हायस्कूल येथील प्रशस्त हॉलमध्ये लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून श्री बाळू भाऊ जाधव (लहुजी शक्ती सेना, कोर कमिटी अध्यक्ष मुंबई), तसेच सचिन भाऊ जाधव (उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष) यांनी कार्यक्रम स्थळी उपस्थिती राहून मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी श्री सुरज दादा पाटील (माजी नगरसेवक), श्री प्रल्हाद पाटील (शिवसेना विभाग प्रमुख उभाटा), श्री वीरेंद्र लगाडे (रिपब्लिकन सेना जिल्हाध्यक्ष), श्री महादेव पवार (समाजसेवक), श्री इम्रान नाईक (समाजसेवक) विजय साळे (समाजसेवक), आयु. कांताबाई घुले (राष्ट्रवादी महिलाध्यक्ष), श्री गजानन महाजन, श्री कोंडीबा हिंगोले इत्यादी कार्यकर्ते कार्यक्रमस्थळी उपस्थित होते सर्वप्रथम आदर्शांची पूजा करून या जयंती कार्यक्रमाचे सुरुवात लहान मुलांच्या सांस्कृतिक गीत गायनाने सुरुवात केली लहान मुलांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विषयी भाषण व गीत गायन केले कुमारी ममता हनवते, स्वरा हनवते, लखन यांनी आपली कला सादर केली, आयु प्रा. विद्या पारधी यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विषयी उत्कृष्ट भाषण केले व उपस्थित सर्व मान्यवरांनी आपल्या मनोगतातून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी त्या काळातील जाती व्यवस्थेच्या खडतर प्रवासातून वंचित, सोशीत, कष्टकरी, कामगारांच्या व्यथा मांडून समाज घटकांना न्याय मिळवुन दिला व सातसमुंदर पार जाऊन रशिया सारख्या परदेशांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वरती पोवाडा गायला व त्यांची साहित्यिक म्हणून महाराष्ट्रच काय तर परदेशात त्यांनी आपल्या लेखणीचा आणि कलेचा ठसा उटविला त्यांच्या फकीरा कादंबरीवर सिनेमा तयार झाला, अगदी दीड दिवस शाळा शिकणारा अण्णाभाऊंची आज देश, प्रदेशात जयंती साजरी केली







जाते आहे असे प्रेरणादायी व्यक्तिमत्व अण्णाभाऊ साठे यांच्यामध्ये होते यांचा आदर्श आजच्या पिढीने घेतला पाहिजे अशा शब्दात मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. लहुजी शक्ती सेना अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीच्या कार्यकर्त्यांनी श्रमदान आणि अर्थदान करून सहकार्य केले त्याबद्दल श्री रमेश भाऊ खंदारे (लहुजी शक्ती सेना अध्यक्ष) यांनी सर्वांचे मनापासून कौतुक केले, श्री दीपक लांडगे समिती अध्यक्ष, श्री बाबुराव डोंगरदिवे उपाध्यक्ष, श्री गजानन खंडारे सचिव, श्री रघुनाथ अडागे कोषाध्यक्ष, श्री अक्षय खंडाळे सहकोशाध्यक्ष, श्री अरविंद शेजुळ कार्याध्यक्ष इत्यादी कार्यकर्त्यांनी अतिशय मेहनत घेऊन हा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुलाब पारधे सर आणि पत्रकार कल्याणराव हनवते यांनी केले यावेळी महिला, लहान थोर बालक बालिका व नेरूळ मधील मातंग समाज बंधू यांनी शेकडोंच्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# शिक्षण शक्तिशाली साधन - सौ. जरीना बागवान

लातुर :- रुकय्या बेगम हायस्कूल विद्यालय येथे पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता यावेळी व्यासपीठावर सौ जरीना बागवान (-झख ) सहाय्यक पोलीस निरीक्षक, प्राचार्य याहय्या कसेरी, प्रा. महेफुससर ( निवृत्त ) श्रीमती नाजेमा अब्बास शेख , जूनैदी सर , असिफ बागवान, युसूफ सर मुख्याध्यापक प्राथमिक यांची उपस्थिती होती आपल्या भाषणात पुढे बोलताना सौ जरीना बागवान म्हणाल्या की शिक्षण हे मानव जीवनातील सर्वात मौल्यवान आणि शक्तिशाली साधन आहे. शिक्षणामुळे माणसाच्या जीवनात ज्ञान, प्रगती आणि समृद्धी येते. शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्व घडते, विचारशक्ती विकसित होते आणि समाजात योग्य स्थान मिळते.शिक्षण म्हणजे फक्त पुस्तकी ज्ञान नव्हे, तर अनुभवातून मिळणारे जीवनाचे खरे आकलनही आहे. शिक्षणामुळे माणूस चांगल्या वाईटाचा विचार करू शकतो, निर्णयक्षमता वाढते आणि आत्मविश्वास निर्माण होतो. अशिक्षित माणूस अंधश्रद्धा, अज्ञान आणि दारिद्र्यात अडकलेला असतो, तर सुशिक्षित माणूस विज्ञानवादी, जागरूक आणि प्रगतीशील असतो.





शिक्षणामुळे समाजाचा विकास होतो. शिक्षित लोक समाजात समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा प्रसार करतात. शिक्षणामुळे बेरोजगारी कमी होते आणि आर्थिक उन्नती घडते. म्हणूनच प्रत्येक मुलाला, मुलींना शिक्षण मिळणे हक्काचे आणि गरजेचे आहे. आज भारत सरकार सर्व शिक्षण अभियान, बेटी बचाओ, बेटी पढाओ अशा योजना राबवत आहे, ज्यामुळे मुला-मुलींना समान संधी मिळू शकते. शिक्षणानेच देशाला विकसित राष्ट्र बनवता येते शिक्षण हे जीवनाचे आधारस्तंभ आहे. शिक्षणाशिवाय विकास शक्य नाही. म्हणून विद्या विनयेन शोभते ही म्हण आपण लक्षात ठेवली पाहिजे. प्रत्येकाने शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्याचा लाभ घ्यावा आणि समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणाचा प्रसार करावा. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती नाजेमा बेगम अब्बास शेख यांनी सूत्रसंचालन प्रा.महेफुस सर यांनी केले आभार जूनैदीसर यांनी मानले कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, सहाय्यक, सेवक, पालक, विध्यार्थीनी, विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल च्या वतीने १२४ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- आपण सर्वांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, ३ ऑगस्ट २०२५ ला दुपारी २:३० वाजता, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल चे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर (पेठे नगर), भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. येथे घाण ज्यांनी केली, त्यांनीच ती काढली पाहिजे. करिता हक्क अधिकार मिळविण्यासाठी आमचा लढा चालूच राहिल. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दोन्ही विधानाच्या ८७ व्या व ७९ व्या वर्धापनदिनानिमित्त १२४ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेला एड. जयश्री निकम सोनवणे या उद्घाटनर मार्गदर्शन करणार आहेत. तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्रा. शिवम गायकवाड हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या कार्यशाळेत नोंदणीकृत सर्व प्रतिनिधींना आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. करिता ९४२१६७८६२८, ८८०६३८४११५, ८९८३०८२१२८ या क्रमांकावर नोंदणी करावी. तरी आपले मत पटवून देण्यासाठी व इतरांची मते समजून घेण्यासाठी आपण मित्र परिवारासह उपस्थित राहावे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# कलावंत व वैज्ञानिकांनाच असतं अमरात्वाचं वरदान - ॲड. शैलेश गोजमगुंडे

## बालरंगभूमी परिषदेच्यावतीने बालनाट्य दिवस उत्साहात साजरा

लातूर :- बालरंगभूमी परिषद लातूर शाखेच्या वतीने २ ऑगस्ट हा बालनाट्य दिवस साजरा करण्यात आला. या दिवसाचं औचित्य साधून बालरंगभूमी परिषदेच्या वतीने संबंध महाराष्ट्रात विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याच अनुषंगाने लातूर शाखेच्यावतीने एकपात्री अभिनय स्पर्धा व वेशभूषा स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेचे उद्घाटन नाट्यपरिषद महानगर शाखेचे उपाध्यक्ष, रंगकर्मी डॉ. मुकुंद भिसे, व बाल नाट्य दिग्दर्शिका सुनीता देशमुख यांच्या हस्ते झाले. तर स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती शाखा राज्य उपाध्यक्ष तथा नाट्य दिग्दर्शक ड. शैलेश गोजमगुंडे, चित्रकार प्रा. विनय बागडे, प्रा. डॉ. दिपक वेदपाठक उपस्थित होते.

याप्रसंगी ड. गोजमगुंडे म्हणाले की नाट्यातून बालकांचे मनोविश्व विकसित होते. व्यक्तिमत्व घडते. जगाच्या पाठीवर कलावंत आणि वैज्ञानिकांनाच अमरात्वाचे वरदान प्राप्त आहे. त्यांनी निर्माण केलेल्या कलाकृती व शोध हे त्यांच्या पश्चात कायम चिरंजीव राहतात. बालकावर बालपणापासूनच नाट्यसंस्कार रुजविले तर भविष्यात लातुरातून अनेक कलावंत निर्माण होतील. या स्पर्धेत ४५ बालकलाकार सहभागी झाले होते. त्याचे यथायोग्य परीक्षण





जेष्ठ रंगकर्मी श्री प्रदीप भोकरे व श्री दयानंद सरपाळे यांनी केले.

सदरील अभिनय स्पर्धेत सर्वोत्कृष्ट- आयांश जाधव, उत्कृष्ट- गौरवी बोळेगावे, उत्तम- अक्षरा आंधळे, तर दोन प्रशंसणीय- विवर्ष लामतुरे व शांभवी बेलूरे यांना पारितोषिक मिळाले.

या स्पर्धेसाठी लातूर जिल्हा अध्यक्षा सुमती बिडवे सोमवंशी, नवलाजी जाधव, रणजित आचार्य, मयूर राजापूरे, रवि अघाव, वनिता गोजमगुंडे, प्रिती ठाकूर, तेजश्री घवले, सुवर्णा बुरांडे, शरीफ पठाण, विशाल वाटवडे, कृष्णा शिंदे, तन्मय रोडगे, अभिषेक शिंदे, अभिजित भड, महादेवी हिंगणे, रविकिरण सावंत, सलीम पठाण, महेश पवार यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिरा वेदपाठक व महेश बिडवे यांनी केले तर आभार शरीफ पठाण यांनी मानले. यावेळी बाल स्पर्धक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नारी प्रबोधन मंचच्या प्रबोधन रॅलीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

लातूर : साहित्यारत्न आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती तसेच नारी प्रबोधन मंच व इतर पुरोगामी परिवर्तनवादी संघटनाच्या वतीने १ ऑगस्ट रोजी सकाळी साडे आठ वाजता लातूर शहरातुन भव्य प्रबोधन रॅली काढण्यात आली. सदर रॅलीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून प्रारंभ करण्यात आला. या रॅलीमध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा आणि म.फुले, शाहू महाराज, डॉ.आंबेडकर, जयघोष करण्यात आला. रॅलीमध्ये सहभागी झालेल्या महिला पुरूषांच्या हातामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे फलक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.परिवर्तनवादी जोशपूर्ण घोषणा कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. महात्मा ज्योतीराव फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून ही रॅली महात्मा गांधी चौक मार्गे गांधीजींच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.






आणि त्यानंतर साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे चौक येथे पोहचली. या ठिकाणी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. आले. सदर रॅलीमध्ये नारी प्रबोधन मंचच्या अध्यक्षा सुमती जगताप, कुसुम मोरे, सुनंदा जगताप, संगीता शहरकर, उषा शिंदे, सुनीता बोरगावकर, बिरादार मॅडम, प्रेमाताई देडे, सतीश मिरखलकर, महादेवी स्वामी, सुपर्ण जगताप, शिवाय राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, जिजाऊ ब्रिगेडच्या माने मॅडम, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष माधव बावगे, मराठवाडा जनता विकास परिषदेचे शिवाजी नरहरे, विजय चव्हाण, प्रकाश गायधने, प्राचार्य सोमनाथ रोडे, प्राचार्य नागोराव कुंभार, प्राचार्य आर. डी. निटुरकर, प्रा. अनंत लांडगे, प्रा. सुधीर अनवले, सूर्यप्रकाश धूत, शेखर हविले, जयंती समिती अध्यक्ष राजकुमार होळीकर, नरसिंग घोडके, यू डी गायकवाड, महानंदा शेवाळे, जयप्रकाश दगडे, डॉ. गणेश गोमारे, बी आर पाटील, प्रा. सुभाष भिंगे, कॉ. विश्वभर भोसले, ॲड. सोमेश्वर वाघमारे, अफजल कुरेशी, बरकत काझी, बी. बी. गायकवाड, आदी मान्यवर सहभागी होते.

## काशीदवाडी येथे ह.भ.प.भगवान महाराज शास्त्री यांच्या अमृततुल्य किर्तनाने काल्याची सांगता

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील काशीदवाडी येथे गेल्या १९ वर्षाची परंपरा अखंडित ठेवत गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सात दिवसांपासून चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता शिवरामपुरी मठ संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. भगवान महाराज शास्त्री यांच्या अमृततुल्य कीर्तनाने सांगता संपन्न झाली आहे.

यावेळी केज विधानसभेच्या आमदार नमिताताई मुदडा, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विजयकांत मुंडे,युवा नेते विष्णू घुले,पंचायत समितीचे माजी सदस्य दत्तात्रय ( पिंटु ) बप्पा ठोंबर तसेच परिसरातील व राजकीय,सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी गावकऱ्यांच्या वतीने गेल्या सात दिवसांपासून गावामध्ये सप्ताहा चालू होता. या सप्ताहासाठी सात दिवस टाळकरी,मृदंगाचार्य,विणेकरी यानी मनोभावे सेवा केल्याने सर्वांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.



यावेळी महाराजांनी गावकऱ्यांचे कौतुक करून असेच कार्य आपल्या हातून होवो अशी इच्छा व्यक्त केली हा अनोखा कार्यक्रम मी आज या ठिकाणी पहिल्यांदा पाहत असल्याचेही त्यांनी मत व्यक्त केले .जमलेल्या भाविकांना व्यसना पासून मुक्त व्हा सल्ला महाराजांनी दिला, कारण व्यसनापासून अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहे यामुळे जमलेले सर्व भाविक भक्तांना व्यसनाच्या आहारी न जाता परमार्थात येऊन आपले आयुष्य सुखी समाधानाने जगावे असा संदेश यावेळी महाराजांनी दिला.

# आदित्य (दादा) पाटील यांची काँग्रेस कमिटीच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी निवड

केज दि ३१ (प्रतिनिधी) काँग्रेसचे युवा नेते तथा केज नगरपरिषचे माजी नगराध्यक्ष आदित्य अशोकराव पाटील यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीस पदी निवड करण्यात आली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये त्यांना मानाचे स्थान मिळाले आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे युवा नेते आदित्य पाटील मागच्या अनेक वर्षांपासून काँग्रेसचे सक्रिय पदस्थ तथा संघटनात्मक काम करत आहेत.नगरपरिषदेचे नगराध्यक्ष भूषवले ,उपनगराध्यक्ष पदावर दमदार काम केले. विद्यमान नगरसेवक पदावर काम करताना नगरपंचायत च्या माध्यमातून केज शहराच्या विकासात गती देण्यासाठी आदित्य पाटील यांनी योगदान दिले. आहे. त्यांचा बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्रश्न सोडवण्यासाठी सक्रियपणे सहभाग आहे. सदभावना पदयात्रेने सामाजिक सलोखा जपला बीड जिल्ह्यातील सामाजिक घडी विस्कटली होती.त्यावेळी आदित्य पाटील यांनी काँग्रेस माध्यमातून सदभावना मसाजोग ते बीड पदयात्रा काढली. या पदयात्रेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ स्वतः पदयात्रेत पायी चालले. पदयात्रेत राज्यभरातून हजारो पदयात्री सहभागी झाले होते. सामाजिक क्षेत्रातील नागरिकांनी मोठा सहभाग नोंदवला होता. महाराष्ट्रामध्ये यानंतर विविध ठिकाणी पदयात्रा काढण्यात आल्या. पदयात्रेच्या माध्यमातून दुभंगलेली मने जोडण्याचा दोन समाजातील तेढ दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. न्यायासाठी सरकारला धारेवर धरण्यात आले होते. काँग्रेसने काढलेल्या पदयात्रेचे राज्यभर कौतुक झाले होते माजी मंत्री अशोकराव पाटील व खा रजनीताई पाटील यांचा राजकिय वारसा लाभलेला आहे. केवळ वारसा मिळाला म्हणून नाही तर एक अभ्यासू राजकिय व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. गांधीवादी विचार घेऊन अत्यंत संयमाने राजकारणाबरोबर समाजकारण करणारे असा त्यांचा लौकिक आहे. नगराध्यक्ष पदावर काम करताना विकासात्मक दृष्टिकोन ठेवून यशस्वीरित्या कार्य केले आहे. युवकांचे आयकॉन युवक काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष पदावर काम करताना जिल्हाभरातील युवकांना सोबत घेऊन



युवक काँग्रेसचे संघटन उभा केले. कार्य निष्ठेमुळे निष्ठावान कार्यकर्ता ते युवकांचा आयकॉन बनले आहेत. सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन काम करणारे युवा नेतृत्व म्हणून ओळख आहे. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी तत्पर असतात. त्यांनी कधीही अडवाआडवीचे राजकारण केलेले नाही. बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक चळवळीतही आदित्य पाटील अग्रेसर राहिलेले आहेत काँग्रेस पक्ष बांधणी यामध्ये पाटील यांचे मोठे योगदान आहे या कार्याची दखल घेऊन त्यांची प्रदेश सरचिटणीस पदी निवड करण्यात आली आहे खासदार रजनीताई पाटील आणि माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी युवक काँग्रेसमध्ये असताना मोठ्या प्रमाणावर पक्षाची संघटनात्मक बांधणी केलेली आहे. सदर कार्याची दखल घेऊन काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीस पदावर निवड करण्यात आली. यापुढील काळामध्ये काँग्रेस पक्षवाढीसाठी सर्वांना सोबत घेऊन काम करणार असल्याचे पाटील यांनी सांगितले त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचा विविध ठिकाणी सत्कार करण्यात आले बीड जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, नूतन प्रदेश चिटणीस गणेश राऊत, उप नगराध्यक्ष पशुपतिनाथ दांगट, नवनाथ थोटे, रमेश पाटील, प्रवीणकुमार शेप यांच्यासह अनेक मान्यवरांनी, पदाधिकारी, व कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE